RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ९, अंक २३(९)] शुक्रवार, फेब्रुवारी २४, २०२३/फाल्गुन ५, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ फेब्रुवारी २०२३.

**अधिसूचना**

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक सीआरसी २०१९/प्र.क्र.२०४(४)/का. १२.—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) महाराष्ट्र राज्यात अंमलात असताना, त्याच्या कलम ७ तसेच कलम ९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून ; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा, उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा महसुली तालुक्याशी त्यांचा जेथवर संबंध असेल तेथवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याशी विचार विनिमय करून, याद्वारे दिनांक १९ मार्च २०२३ पासून, उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा महसुली तालुक्याकरिता सत्र उप विभागाची निर्मिती करीत आहे आणि उक्त सत्र उप विभागाच्या हद्दीमध्ये उद्भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधिश ज्यांचे अध्यक्ष असतील, असे सत्र न्यायालय परांडा येथे स्थापन करीत आहे. प्रमुख सत्र न्यायाधिश, उस्मानाबाद हे परांडा सत्र उप विभागाचे देखील सत्र न्यायाधिश असतील आणि त्यांना, उक्त सत्र उप विभागामध्ये प्रकरणांतील अधिकार स्वतःहून काढून घेण्याचे किंवा सलग अधिकारीतेच्या इतर कोणत्याही न्यायालयास नेमून देण्याचे किंवा त्यांस योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, परांडा येथील सहायक किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधिश यांचेकडे सोपविण्याचे अधिकार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**

शासनाचे विधि सल्लागार-नि-सह सचिव.